# नव्या शैक्षणिक धोरणाचे स्वागत

## मराठी भाषेला येणार चांगले दिवस, उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणार

कोल्हापूर, ता. २९ : नवे शैक्षणिक धोरण आज जाहीर करण्यात आले. यामध्ये पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी वाढवण्यात आला आहे. एम.फील रद्द झाले असून पीएच.डी. करण्याचा मार्गही सुकर केला आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांची निर्मिती, मातृभाषेतून शिक्षण आणि एकाच वेळी दोन शाखांमध्ये शिक्षण घेता येणार आहे. या गोष्टी देशातील उच्च शिक्षणाची उंची वाढवणाऱ्या असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले. तसेच भाषेचा विकासासाठी देखील हे धोरण महत्त्वाचे असल्याचे मत त्यांनी नोंदवले आहे.

### सर्वसमावेशक असणारे धोरण

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण या सर्वांचा दूरदृष्टीने विचार केला गेला आहे. या धोरणानुसार विज्ञान, तंत्रज्ञान मानव्यशास्त्र आणि सामाजिक शास्त्रांचे महत्त्व वाढणार आहे. विशेष म्हणजे सर्वसामान्यांना शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. हे शैक्षणिक धोरण दूरदृष्टीने बनवले असल्याचे दिसते.

**- डॉ. बी. एम. हिर्डेकर**, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ.

### विद्यार्थी स्नेही धोरण

नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्याला एकाचवेळी दोन विषयांत पदवी अभ्यासक्रम करता येणार आहे. एमफीलचा अनावश्यक टप्पा रद्द झाला आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारणार असून देशभरातील विद्यापीठांमध्ये सामायिकता निर्माण होईल. नवे शैक्षणिक धोरण विद्यार्थी स्नेही आहे.

**- प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे,** उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ.

### मराठी भाषेचा विकास होईल

एखादी भाषा अधिकाधिक वापरात आली तर त्यातून भाषेचा विकास होतो. नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषेला महत्त्व दिले गेले आहे. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून केल्यामुळे महाराष्ट्रातील अमराठी विद्यार्थ्यांनाही ती शिकावी लागेल. त्यातून मराठी भाषा वापरणाऱ्यांची संख्या वाढेल. त्यातून मराठी भाषेचा विकास होईल. संदर्भग्रंथ मराठीत निर्माण होतील. इंग्रजी भाषेच्या अडचणीची समस्या दूर होईल. शिक्षण सर्वत्र पोहचेल. हिंदी भाषेचा वापर टाळणाऱ्या राज्यातही राष्ट्रीय भाषेचा प्रचार आणि प्रसार होईल.

**- प्रा. डॉ. नंदकुमार मोरे,**
मराठी भाषातज्ज्ञ.

### शैक्षणिक स्वायत्ता मिळणार

पूर्वीच्या तक्षशिला आणि नालंदा विद्यापीठाची चेतना नव्या शैक्षणिक धोरणात दिसते. यामुळे महाविद्यालयांना शैक्षणिक स्वायत्ता मिळणार आहे. पुढील वर्षात ४५ हजार स्वायत्त महाविद्यालये देशात तयार होतील. भविष्यात त्यांना आर्थिक स्वायत्ताही मिळेल. त्यातून शिक्षकांच्या पगाराचे काही प्रश्न तयार होण्याची शक्यता आहे. पण उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचा दृष्टीने हे धोरण स्वागतार्ह आहे. या धोरणामुळे मातृभाषेला सर्वच बाबतीत प्राधान्य मिळणार आहे. शिक्षक, विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य आणि आनंद देणारे धोरण आहे.

**- प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे,** महावीर महाविद्यालय.

# शिक्षणाचा नवा अध्याय!

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी** | **दहावी-बारावी बोर्डाचे महत्त्व कमी** | **पाचवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण** | **आंतरशाखीय शिक्षणाला सुरुवात**

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** तब्बल ३४ वर्षांनंतर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत आमूलाग्र बदल करण्यात आले असून दहावी आणि बारावी या बोर्डाचे महत्त्व आता कमी होणार आहे. शालेय शिक्षणाची रचना १० + २ ऐवजी ५+३ +३ +४ अशी झाली आहे. आता सहावीनंतर व्यावसायिक शिक्षणही दिले जाईल; तर ५ वी पर्यंत मातृभाषेत शिक्षणाला प्राधान्य असेल.

दोन्ही शिक्षण प्रकारांना शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. एकाचवेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊनही उच्च शिक्षण पूर्ण करता येईल. शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला जाणार असून २१ व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे, असे केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल-निशंक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या मंत्रालयाचे नावही बदलण्यात आले असून ते आता 'शिक्षण मंत्रालय' झाले आहे.

## नवे सूत्र...

शालेय शिक्षणाची रचना आता १० + २ ऐवजी ५ + ३ + ३ + ४ अशी झाली आहे. पहिली तीन वर्षे पूर्वप्राथमिक, त्यानंतर दोन वर्षे पहिली व दुसरी. पुढील प्रत्येकी तीन वर्षे तिसरी ते पाचवी व सहावी ते आठवी अशी असतील. अखेरची ४ वर्षे नववी ते बारावी अशा १५ वर्षांमध्ये शालेय शिक्षण विभागण्यात आले आहे.

## एकच नियामक मंडळ...

सध्या उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळ्या नियामक संस्था कार्यरत आहेत, त्याऐवजी (विधी आणि वैद्यकीय शाखा वगळता) एकच नियामक मंडळ असेल. अमेरिकेप्रमाणे भारतातही संशोधनाला महत्त्व देणे व त्याचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय संशोधक संस्था स्थापन केली जाईल. केवळ विज्ञानच नव्हे तर समाजशास्त्रातील संशोधनालाही वित्तीय मदत केली जाईल. देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला जाईल. त्यातून परदेशी दर्जेदार शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांशी संवाद वाढेल व शैक्षणिक देवाणघेवाणही होऊ शकेल.

## आंतरशाखीय शिक्षण...

नव्या शैक्षणिक धोरणात १० वी १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा घेतल्या जाणार असल्या तरी त्याचे महत्त्व कमी होईल. या परीक्षा वर्षातून दोन वेळा देखील होऊ शकतील. पाठांतर करून उत्तर लिहिण्याऐवजी दैनंदिन उपयुक्त ज्ञानावर आधारित परीक्षा असेल. विज्ञान व कला अशा वेगळ्या शाखांतील विषय एकत्र घेऊन शिकता येतील. त्यामुळे आंतरशाखीय शिक्षण सुरू होईल.



## प्रगतिपुस्तकातही बदल...

प्रगतिपुस्तकात फक्त गुण व शिक्षकांचे शेरे न देता स्वतः विद्यार्थी, सहविद्यार्थी व शिक्षक यांनी मूल्यमापन करायचे आहे. त्या आधारावर विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्यांचा विकास कसा करता येईल हे ठरवता येईल.

## एम.फिलऐवजी थेट पीएचडी

उच्च शिक्षणातही लवचीकता आणली गेली असून महाविद्यालये तसेच विद्यापाठांमध्येही आंतरशाखीय विषय एकत्र शिकता येतील. कुठल्याही टप्प्यावर शिक्षण थांबवता येईल. त्या शिक्षणाचे गुणांक राखून ठेवले जातील व काही काळाने पुढील शिक्षण घेता येईल. ज्या विद्यार्थ्यांना संशोधन करायचे असेल, त्याच्यासाठी ५ वर्षांचा अभ्यासक्रम असेल. त्यानंतर एम.फिल करण्याची गरज उरणार नाही, थेट पीएचडीसाठी प्रवेश घेता येईल. अन्यथा ३ वर्षांत पदवी घेता येईल.

## शुल्कनिश्चिती

२०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किमान एकतरी बहुविध आंतरशाखीय महाविद्यालय सुरू केले जाईल, असे लक्ष्य केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने ठेवले आहे. आत्तापर्यंत एकाच शाखेतील विषय घेऊन पदवी घेतली जात असे, आता पदवी बहुविधशाखांतील विषय एकाचवेळी घेऊन पूर्ण केली जाणार आहे. केवळ विद्यापीठेच नव्हे तर, महाविद्यालयेही बहुविधशाखा अभ्यासक्रमाची होणार असल्याने त्यानुसार शुल्कनिश्चिती केली जाईल. सरकारी तसेच खासगी शैक्षणिक संस्थांच्या शुल्क आकारणीसाठी समान शर्ती निश्चित केल्या जाणार आहेत. त्या चौकटीतच शुल्कनिश्चित केले जाईल व शुल्क आकारणीवर कमाल मर्यादाही घालण्यात येईल.

वयाच्या तिसऱ्या वर्षीच मूल शाळेत ■ पूर्व प्राथमिक शिक्षण कायद्याच्या कक्षेत ■ परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश नव शिक्षण अभियान : पान २